# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१६-१७/ 4768 दिनांक : 24/11/16.

प्रति,
प्राचार्य/संचालक,
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग.

विषय :- संस्थेत सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे (अक्रिडीटेशन ) मुल्यांकन व दर्जा मानांकन बाबतची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत

संदर्भ :- १.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक ईबीसी -२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण -२ दि.३१.०३.२०१६
२.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २३अ/एडीएम/२०१६/१२१० दि.०१.०९.२०१६
३.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२३अ/एडीएम/अक्रिडीटेशन/२०१६/१५५४ दि.२४.१०.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती,विमुक्त जाती ,भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेच्या अनुषंगाने सविस्तर तरतुदी निर्गमित केल्या आहेत. शुल्क प्रतिपूर्ती बाबत सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर योजनेअंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शिक्षण संस्थांनी पुढील तीन वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर परिषदेकडून मुल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त करणे आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मुल्यांकन व दर्जा निश्चिती करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुलांकन व दर्जा प्राप्त होईपर्यंत वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील असे स्पष्ट केले आहे.

आपल्या संस्थेच्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे सक्षम शिखर परिषदेकडून मुल्यांकन व दर्जा मानांकनाची शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पर्यंतची माहिती दि.०३.१२.२०१६ पर्यंत या कार्यालयाच्या लॉग-इन मध्ये सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये भरावी.

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in


**प्रपत्र –ब**

मुल्यांकन व दर्जा मानांकनाची संस्था व अभ्यासक्रमनिहाय माहिती (पदवी व पदव्युत्तर पदवी)

विभाग :-पुणे विभाग

| संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | मानांकन व दर्जा मुल्यांकन झाले असल्यास त्याचा कालावधी | मानांकन व दर्जा मुल्यांकन न झाले असल्यास त्याची कारणे | मानांकन व दर्जा मुल्यांकना बाबत शिखर संस्थेकडे अर्ज केले आहे किंवा कसे | नसल्यास त्याची कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे